Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 04 November 2026

Time: 7.10 to 7.20 AM

Language Marathi

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

प्रादेशिक बातम्या

दिनांक: ०४ नोव्हेंबर २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी केंद्र सरकार खंबीरपणे उभं असल्याची पंतप्रधानांची ग्वाही
- देशातली शहरं ही केवळ राहण्याची ठिकाणं नसून, आर्थिक घडामोडींची प्रमुख केंद्रं-हिंजवडी मेट्रो लोकार्पण सोहळ्यात पंतप्रधानांचं प्रतिपादन
- देशभरातल्या रब्बी पिकांच्या पेरण्या गेल्या वर्षीच्या तुलनेत ४६ टक्क्यांनी कमी, कृषी मंत्रालयाची माहिती
- प्रतिजैविकांचा अनावश्यक वापर रोखण्यासाठी फार्मासिस्टनी सक्रिय भूमिका बजावावी- केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचं आवाहन

आणि

- मायक्रो फायनान्स कंपन्यांनी शेतकऱ्यांकडून सक्तीची वसुली करु नये, छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

****

महाराष्ट्रातल्या दुष्काळाची केंद्र सरकारला पूर्ण जाणीव असून, राज्यातल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी केंद्र सरकार खंबीरपणे उभं आहे, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना दिली. दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाठीशी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार संवेदनशीलतेनं उभं असल्याची ग्वाही देत, देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली गेल्या काही वर्षांत राज्यात जलसंधारणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामं झाल्याचं त्यांनी सांगितलं. काल पुण्यातल्या मेट्रो लोकार्पण सोहळ्यात बोलतांना पंतप्रधानांनी, शेतकऱ्यांना काळजी न करण्याचं आवाहन केलं, ते म्हणाले...

बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी

**

दरम्यान, सुमारे २१ हजार ८०० कोटी रुपये खर्चाच्या पुणे मेट्रो प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी पंतप्रधानांच्या हस्ते काल दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आली. देशातली शहरं ही केवळ राहण्याची ठिकाणं नसून, आर्थिक घडामोडींची प्रमुख केंद्रं आहेत. देशभरातल्या शेकडो लहान शहरांचा विकास करून त्यांना सक्रिय आर्थिक केंद्र बनवणार असल्याची ग्वाही पंतप्रधानांनी यावेळी दिली. गेल्या दहा-बारा वर्षात देशातल्या मेट्रो जाळ्याचा जलदगतीनं विकास झाला असून, आता देशातल्या सव्वीस शहरांत मेट्रोचं जाळं जवळजवळ बाराशे किलोमीट लांब विस्तारलं आहे, असं पंतप्रधानांनी सांगितलं. पायाभूत सुविधांमधील सरकारी गुंतवणुकीमुळे जीवनमान उंचावण्यासोबतच रोजगाराच्या संधीही निर्माण होत असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**

या प्रकल्पांमुळे मोबिलिटीच्या क्षेत्रात पुणे देशात अग्रेसर होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

मेट्रो-तीन हा प्रकल्प पुण्याच्या भविष्याला नवा आकार देणारा आणि नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीच्या समस्या कमी करणारा ठरेल, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला. तर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी यावेळी बोलतांना, ही देशातली सार्वजनिक-खासगी भागीदारीतून साकारलेली पहिली मेट्रो मार्गिका असून, देशातली पहिली १०० टक्के महिला संचालित मेट्रो असणं अभिमानास्पद असल्याचं मत व्यक्त केलं.

****

देशभरातल्या रब्बी पिकांच्या पेरण्या गेल्या वर्षीच्या तुलनेत ४६ टक्क्यांनी कमी झाल्याची माहिती कृषी मंत्रालयानं दिली आहे. गेल्या वर्षी तीस ऑक्टोबरपर्यंत देशात सुमारे साठ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या होत्या, त्या तुलनेत या वर्षी सुमारे सदोतीस लाख हेक्टर क्षेत्रावरच पेरण्या झाल्या आहेत. यंदाच्या कमी पावसामुळे मातीत आर्द्रता कमी असून सिंचनासाठी पाणी कमी असल्याने रब्बी पेरण्यांमध्ये घट झाली असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

प्रतिजैविकांचा अनावश्यक आणि अयोग्य वापर रोखण्यासाठी फार्मासिस्टनी सक्रिय भूमिका बजावावी, असं आवाहन केंद्रीय आयुष राज्यमंत्री तथा आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं आहे. जागतिक फार्मासिस्ट दिन आणि राष्ट्रीय फार्मसी सप्ताहानिमित्त भारतीय फार्मसी परिषद आणि एमजीएम विद्यापीठ यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय सोहळ्यात ते काल छत्रपती संभाजीनगर इथं बोलत होते. 'स्वस्थ भारत, समर्थ महाराष्ट्र' घडवण्यासाठी औषधांचा जबाबदारीनं वापर करण्याचा संकल्प सर्वांनी करावा, असं आवाहनही जाधव यांनी यावेळी केलं.

****

राज्याच्या वैद्यकीय आणि आरोग्य सेवा गट-अ संवर्गातल्या एक हजार ४४० वैद्यकीय अधिकाऱ्यांना आज नियुक्ती आदेश प्रदान करण्यात येणार आहेत. यामध्ये ६७४ विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी आणि ७६६ एमबीबीएस वैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

****

एसआयआर अर्थात विशेष मतदार यादी फेरतपासणी आणि पडताळणी प्रक्रियेदरम्यान, आधी मतदार म्हणून नोंदणी झालेली असूनही ज्यांची नावं प्रारूप मतदार यादीतून वगळली गेली आहेत, त्यांच्यासाठी भारतीय निवडणूक आयोगानं फॉर्म-सहा भरण्याबाबत स्पष्टीकरण दिलं आहे. प्रारूप मतदार यादीत नाव नसल्यास, यापूर्वी मतदार म्हणून नोंदणी झालेली असली तरी फॉर्म-सहा सादर करणं आवश्यक असून, हा फॉर्म भरणं म्हणजे खोटी घोषणा ठरत नाही, असं आयोगानं म्हटलं आहे. दुसऱ्या मतदारसंघात नोंदणी नसलेल्या आणि कायद्यानुसार योग्य घोषणा करणाऱ्या व्यक्तींवर केवळ फॉर्म-सहा भरल्याबद्दल लोकप्रतिनिधित्व कायद्यानुसार कारवाई केली जाणार नाही, असंही आयोगानं स्पष्ट केलं आहे.

****

क्षयरोगमुक्त महाराष्ट्र अभियानांतर्गत क्षयरोगाचं जलद निदान करणारी ट्रू नेट क्काट्रो आण्विक निदान यंत्रं राज्यभर वापरण्यात येणार आहेत. दुर्गम आणि ग्रामीण भागांतल्या नागरिकांनाही दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात प्राथमिक आरोग्य केंद्रं, ग्रामीण रुग्णालयं आणि जिल्हास्तरीय आरोग्य संस्थां अशा ३०० ठिकाणी ही यंत्रे बसवली जातील. सुमारे ४१ कोटी रुपये खर्चाच्या आणि २१ महिन्यांच्या या प्रकल्पासाठी त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला आहे.

****

छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६७ व्या दीक्षांत समारंभ आज राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या उपस्थितीत होणार आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत साधेपणाने हा दीक्षांत सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

****

जालना जिल्ह्यातल्या दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक आणि मानसिक आधार देण्यासह पाणीटंचाई, चारा उपलब्धता आणि ग्रामीण रोजगाराच्या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. दुष्काळी परिस्थितीच्या आढावा बैठकीत त्या काल बोलत होत्या. जिल्ह्यातल्या ६ लाख ४४ हजार शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रिम मदत थेट बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या मदतीमुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

लातूर जिल्ह्यात यंदा सरासरीपेक्षा अतिशय कमी पाऊस झाला असतानाही औसा तालुक्यातल्या बाणेगाव इथले प्रगतिशील शेतकरी चंद्रकांत परिहार यांनी अडीच एकर क्षेत्रात तैवान पिंक जातीच्या पेरूचं भरघोस उत्पादन घेतलं आहे. याबाबत अधिक माहिती देत आहेत आमचे वार्ताहर,

बाईट – शशीकांत पाटील

****

नांदेड जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागातल्या मजुरांचं होणारं स्थलांतर रोखण्यासाठी जिल्हा प्रशासन विशेष उपाययोजना करत आहे. व्हीबी जी राम जी आणि महाराष्ट्र रोजगार हमी योजना प्रभावीपणे राबवण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या कोणत्याही मायक्रो फायनान्स कंपनीनं शेतकऱ्यांकडून सक्तीची वसुली करु नये, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी या कंपन्यांना दिले आहेत. जिल्ह्यातल्या सर्व मायक्रो फायनान्स कंपनी संचालकांच्या बैठकीत ते काल बोलत होते. कोणत्याही वित्तीय संस्थेकडून वसुलीसाठी तगादा झाल्यास जिल्ह्यातल्या शेतकरी वा ग्रामस्थांनी १८०० १०२

१०८० या टोल फ्री क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा, असं आवाहनही त्यांनी केलं.

****

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरण– म्हाडाच्या छत्रपती संभाजीनगर तसंच लातूर जिल्ह्यात विविध योजनांसाठी संगणकीय सोडत मंडळाचे मुख्य अधिकारी वैभव केदारे यांच्या हस्ते काल काढण्यात आली. सदर सोडतीसाठी एकूण दोन हजार ६४२ अर्ज प्राप्त झाले.

****

एसटी महामंडळाचं उत्पन्न वाढवण्यासाठी नवीन बसेस उपलब्ध करून देण्यासह अधिक उत्पन्न मिळणाऱ्या मार्गांना प्राधान्य द्यावं, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. काल बीड इथं पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. एसटी कर्मचाऱ्यांचं वेतन वेळेत जमा करण्यासह त्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल, असं त्यांनी सांगितलं.

****

डिजिटल अरेस्टच्या नावाखाली एका ६६ वर्षीय निवृत्त कर्मचाऱ्याची २८ लाख ५१ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी लातूरच्या सायबर पोलिसांनी सहा आरोपींना अटक केली आहे. मध्यप्रदेश, दिल्ली आणि हरियाणा या तीन राज्यांमधून आरोपींना अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्यांना सहा नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सायबर आर्थिक फसवणूक झाल्यास तातडीने १९३० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, असं आवाहन लातूर पोलिसांनी केलं आहे.

****